Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

# भारतातील दहशतवाद

**प्रा.डॉ. अंकुशराव अंबादासराव चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
मत्स्योदरी कला महाविद्यालय,
तिर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना

मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जस जशी प्रगती केली तस तसा नवनविन शस्त्रांचा व अस्त्रांचा शोध लागला. या सर्व शस्त्रांचा वापर दहशतवादी संघटनाही करु लागल्या आहेत. आधुनिक दहशतवाद ही अतिशय भयावह आहे कारण त्याने संपूर्ण मानवी जीवनंच संपवण्याची भिती निर्माण झाली आहे. भारतात पूर्वीपासूनच या ना त्या कारणामुळे दहशतवादाने आपले डोके वर काढलेले आहे. ते भारतासाठी नविन नाही. दहशतवाद म्हणजे राजकीय उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरीता काही व्यक्तीगत गटांनी पस्थापीत शासकीय अधिका-याच्या बाजुने अगर विरुध्द दहशतीचा किंवा हिंसाचाराचा केलेला वापर हा दहाशतवाद आहे किंवा नाही गौण राष्ट्रीय समुहाकडून किंवा छुप्या सरकारी हस्तकातर्फे नागरी लक्ष्यावर पुर्वनियोजीत व राजकीय दृष्ट्या प्ररित हिंसाचाराचा केलेला प्रयोग हा दहशतवाद आहे. या तत्वाचा स्विकार काही भारतीय व गैरभारतीय गटांनी केल्याने भारतीय लोकशहीला आव्हान निर्माण केले. राजकीय नेत्याचे अपहरण, विमान अपहरण करून आपल्या मागण्या पुर्ण करण्यासाठी प्रयत्न दहशतवादी संघटना करत असतात.

भारतीय लोकशाहीने आज ७३ वर्ष पुर्ण केले आहे. या काळात अनेक आव्हाने या लोकशाही समोर उभे राहिले आहे जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताचा उल्लेख केला जात असला तरी दहशतवादाने या लोकशाहीला फार मोठे आव्हान दिलेले आहे जनतेचा लोकशाही व शासन यावरील विश्वास कमी करण्याचा प्रयत्न दहशतवादाने केला आहे. देशात अनेक ठिकाणी दहशतवादी हल्ले झाले. हजारो निष्पाप लोक यात मारले गेले आहे. परंतु न्यायालयाने अनेक दहशतवादी हल्यात दहशतवाद्यांना यांना दोषी ठरवून फाशीची शिक्षा दिली आहे. परंतु राज्यकर्त्यांच्या सत्तेच्या राजकारणामुंळे अनेक दहशतवादी त्याचा गैरफायदा घेतांना दिसतात.

**दहशतवादाचा अर्थ**

इनसायक्लोपीडीया ब्रिटानीका या शब्दकोषानुसार योजनाबध्द पध्दतीने भय व निराशा पसरविणे व हिंसाचाराच्या अनपेक्षीत पध्दतीचा अवलंब करणे म्हणजे दहशतवाद होय आणि या पध्दतीचा अवलंब सर्वसामान्य लोक अथवा व्यक्तीच्या विरुध्द राजनैतिक उददेशाच्या प्राप्तीसाठी केला गेला असावा.

**जेन किस च्या मते -**

हिंसेची धमकी किंवा व्यक्तीगत दहशतीची कृती करुन प्रामुख्याने दहशतीव्दारा भिती निर्माण करण्याच्या दृष्टीने आखलेली योजना म्हणजे दशहतवाद होय. बर्गर या विचारवंताच्या मते कोणताही हेतू भविष्यकाळात साध्य करण्यासाठी बळाचा वापर करुन भिती निर्माण करण्याची पध्दत दहशतवाद होय. आपला राजकीय स्वार्थ साधुन घेण्यासाठी जेंव्हा हिंसेचा वापर केला जातो तेंव्हा दहशतवादाची निर्मिती होते. त्या कृतीमुळे निरपराध लोकांचा बळी जातो. दहशतवादाचा प्रश्न जागतीक स्तरावर भेडसावत असला तरी भारताच्या संदर्भात ही जुनीच समस्या आहे. भारत हा दहशतवादाचा सर्वात मोठा बळी ठरला आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद जो केवळ जम्मु काश्मीर पुरताच मर्यादीत राहिला होता तो आता देशभर पसरलेला आहे. इंग्रजांचे फोडा आणि झोडा हे धोरण बॅ. जिनांच्या व्दि-राष्ट्रवादाचा सिध्दांत विभक्त मतदारसंघ इत्यादी धोरणांनी भारतात दहशतवादाचे बिजारोपण झाले आज जगात सर्वात जास्त दहशतवादाने प्रभावित झालेला देश भारत आहे असे अमेरिकेच्या अहवालात देखील म्हटले आहे.

भारतात दहशतवादयाकडून बॉम्बस्फोट घडवून आणले जात आहे लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, सहिष्णुता या तत्वांना महत्व दिले जाते. या तत्वावर लोकशाहीचा डोलारा उभा असतो. परंतु दहशतवाद या तत्वविरोधी आहे. लोकाहशीत शांततेला महत्व असते तर दहशतवाद अशांतता महत्वाची माणतो. आपले राजकीय हित साध्य करण्यासाठी दहशतवादात हिंसेचा वापर केला जातो जो की, लोकशाहीत अमान्य आहे काश्मीर आणि पुर्वोत्तर राज्यात मोठ्या प्रमाणात दहशतवादी कारवाया होत आहे.

काश्मीरला स्वतंत्र करण्याची भाषा करीत आहे अल-कायदा, लष्कर ए तोयबा,या संघटनेची भारतात अशांतता पसरविण्याचे कार्य सुरु केले आहे या कारवायांना स्थानिक राजकारणी आणि फुटीरवादी पाठबळ देतांना दिसतात. आज आर्थिक मुलतत्ववादी दहशतवाद सिमापार दहशतवाद आणि नक्षली दहशतवाद या प्रमुख दहशतवादाने भारत ग्रस्त आहे. त्यामुळे भारतीय समाजात दुही वाढत गेली

आहे. आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम झाला आहे. मोठ्या प्रमाणात पैसा व मानवी शक्ती दहशतवादाच्या नियंत्रणावर खर्च होते त्याच बरोबर अनेक समाजउपयोगी बुध्दीजीवी लोक या लढयात भारताने हरवले आहेत ही आपल्या देशाची फार मोठी हानी आहे. भारतातील काही प्रमुख दहशतवादी संघटनास हिजबुल मुजाहिदीन, लष्कर ए तोयबा, युनायटेड फ्रंट उल्फा, हरकत उल अन्सार, जम्मु – काश्मीर लिबरेशन फ्रंट, उल्फा लिटे खलिस्तान, कमांडो फोर्सेस व खलिस्तान लिबरेशन फोर्सेस, नागा बंडखोर संघटना.

थोडक्यात दहशतवाद म्हणजे दुर्बलांनी सबळा विरुध्द सुरु केलेल एक छुपे युध्दच असते. कारण थेट युध्दात आपला निभाव लागणार नाही याची जाणीव दुर्बलांना असते म्हणजे ते दहशतवादासारख्या खडतर मार्ग स्विकारतात. आपल्या मागण्या मान्य व्हाव्यात म्हणून प्रमुख नेत्याच्या हत्या घडवून आणणे आत्मघातकी बॉम्ब वापर करणे महत्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी बॉम्ब पेरणे, व्यक्तीचे अपहरण करणे, ओलीस ठेवणे अशा मार्गाचा अवलंब दहशतवादी करतात.

**दहशतवादावरील उपाय -**

१. न्यायदानात होणारा विलंब कमी झाला पाहिजे.
२. बेरोजगारी कमी केली पाहिजे
३. दहशतवादाला पाठींबा देणा-या देशांतर्गत व्यवस्था नष्ट करणे
४. समाजातील कोणत्याही घटकांवर अन्याय होणार नाही याची काळजी शासनाने केली पाहिजे.
५. दहशतवाद विरोधात नाकरीकांनी सतर्क राहिले पाहिजे
६. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रप्रेम, सर्वधर्म समभाव ही भावना जोपासली पाहिजे.
७. दहशतवाद विरोधी कायदे अधिक परिणामकारक असले पाहिजेत.

थोडक्यात सांगायचे म्हणजे व्यक्ती सर्वात जास्त आपल्या जीवावर प्रेम करतो कोणत्याही परिस्थितीत त्याला मृत्यू नको असतो परंतु दहशतवादी हा माणुस असूनही तो आपले प्राण गमावण्यास का तयार होतो याचाही विचार व्हायला हवा.

दहशतवादाचे कारण मुळाशी जावून शोधायला हवे. दहशतवादी यांना गोळया घालून किंवा गळफास देवून संपवता येणार नाही तसे असते तर आजपर्यंत शेकडो दहशतवासद्यांना यमसदरनी पाठवले असते तेंव्हा तो यापूर्वी संपायला हवा होता तो दिवसेदिवस अधिकाधिक अक्राळ विक्राळ रुप धारण करत आहे असे दिसून येते समाजातील बहुसंख्यकांनी अल्पसंख्याकांना सुरक्षिततेची हमी

द्यायला हवी कारण अल्पांख्यकांना बहुसंख्यकांची नेहमतीच भिती वाटत असते. जर असुरक्षितता वाढत राहिली तर ते आक्रमक मार्गाचा स्विकार करतात. आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तीमुळे संपूर्ण समुदायाला बदनाम करु नये सांप्रदायीक सदभावना सहकार्य व शांततेचा अवलंक करायला हवा.

**संदर्भ ग्रंथ**

१. सुहास पळशीकर – जमातवाद धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही पुणे - २००३
२. मानचंद खंदेला – आंतरराष्ट्रीय आंतकवाद दिल्ली
३. अरुण सारथी – हिंदू मुस्लीम वैमनस्याची ऐतिहासीक मिमांसा पुणे - २००३
४. डॉ. एम. एस. पलसानिया – अंतरराष्ट्रीय दहशतवाद एंव भारत को नई सुरक्षात्मक चुनौतीया जयपुर- २०१०
५. प्रा. म.न. उदगावकर एकविसाव्या शतकातील दहशतवाद, पुणे – २००७
६. कुमार नागोराव – लोकशाही स्वरुप व समस्या प्रमोधन प्रकाशन लातुर १९८८
७. उदगावकर म. न. अदृश्य भस्मासुर – दहशतवाद प्रमोद प्रकाशन पुणे - १९९०